-: प्रेसनोट दिनांक- ०९/१०/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक विकास रोहीदास सोनवणे वय ५० वर्षे, पद - अन्न सुरक्षा अधिकारी, वर्ग-२, सहायक आयुक्त, अन्न औषध्र प्रशासन ,रघूकुल बिल्डींग, सुभाषरोड, कोल्हापूर रा.ए १०२ लाईफ स्टाईल अपार्टमेंट, प्रतिभानगर कोल्हापूर यांनी लाच मागणी केलेबाबत.....**

---

यातील तकारदार यांचे अंबिका बेकर्स नावाचा बेकरी व्यवसाय गारगोटी रोड कोल्हापूर येथे आहे. दि.१०/१०/२०२३ रोजी श्री.सोनवणे, अन्न सुरक्षा अधिकारी, कोल्हापूर व त्यांच्यासोबत त्यांचा एक सहकारी सकाळी ११.०० वा. सुमारास तकारदार यांचे अंबिका बेकर्स या बेकरीमध्ये आले होते त्यावेळी त्यांनी बेकरीमधील काही सॅम्पल्स घेतले आहेत असे सांगुन तकारदार यांना सदर ठिकाणी ताबडतोब या. त्यावर तकारदार यांनी त्यांचे आईला दवाखान्यात घेवून आलो आहे, तेव्हा थोडा वेळ दया असे सांगीतले. तेव्हा त्यांनी ते दुपारी पुन्हा येतो असे सांगुन निघुन गेले होते त्यानंतर दुपारी ४.०० वा.चे सुमारास तकारदार हे बेकरीमध्ये असताना श्री. सोनवणे व त्यांचा आणखी एक सहकारी असे बेकरीत आले. त्यावेळी सोनवणे यांनी तकारदार यांना तुमचे बेकरी मध्ये तयार केलेले खारी, ब्रेड, टोस्ट इत्यादी सॅम्पल घेतले आहेत तुमच्यावर कारवाई करणार तुम्ही काय करणार सांगा असे विचारले त्यावेळी तकारदार यांनी त्यांना साहेब काय करायचे ते तुम्हीच सांगा. त्यावेळी सोनवणे यांनी दर सहा महिन्यासाठी १५,०००/- रूपये दयावे लागतील असे तकारदार यांना सांगितले. म्हणाले त्यावेळी तकारदार यांनी त्यांना १०,०००/- रूपये देतो असे म्हणाले असता त्यांनी सोनवणे यांनी तडजोड करून तकारदार यांचेकडे १५,०००/-रूपये मागणी केली. त्यानंतर तकारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तकार दिलेली होती.

तकारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तकार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तकारदार यांचे अंबिका बेकर्स या बेकरीमध्ये तयार केले खारी, ब्रेड, टोस्ट इत्यादी सॅम्पल घेतले असुन त्यावर कोणतीही कारवाई न करणेसाठी आलोसे विकास रोहीदास सोनवणे वय ५० वर्षे, पद - अन्न सुरक्षा अधिकारी यांनी तकारदार यांचेकडे १५,००० रूपयांची लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

सदरबाबत तकारदार यांनी आरोपी लोकसेवक विकास रोहीदास सोनवणे वय ५० वर्षे, पद - अन्न सुरक्षा अधिकारी, वर्ग-२, सहायक आयुक्त, अन्न औषध प्रशासन ,रघूकुल बिल्डींग, सुभाषरोड, कोल्हापूर यांनी तकारदार यांचे अंबिका बेर्कस या बेकरीतील सॅम्पल तपासून त्यावर कारवाई न करणेसाठी तकारदार यांचेकडे अप्रामाणीकपणे स्वतःचे फायदयाकरीता बेकायदेशिरपणे २५,०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती माझेकडे १५,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली आहे म्हणुन त्याचेविरूध्द जुना राजवाडा पोलीस ठाणे कोल्हापूर येथे दिले फिर्यादीप्रमाणे गुन्हा दाखल करून पुढील तपास आम्ही स्वतः करीत आहोत.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार वैष्णवी सुरेश पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.कोल्हापूर, व पथक अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१
२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :-
०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.
३) वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७.
४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.
५) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४
६) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.